जनसामान्यांच्या साहित्य ❋ संस्कृती ❋ कलाभिरुची संवर्धनास वाहिलेली एकमात्र मराठी मासिक पत्रिका
रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया नवी दिल्ली र.नं.४३६५८/८४
पोस्टल रजिस्ट्रेशन नं. एन्.आर./ए.टी.आय/ १३६/२०१२-१४
AKSHAR VAIDARBHI- ISSN 0976-0296

# अक्षरवैदर्भी

संस्थापक संपादक : (स्व.) सुदाम सावरकर

वर्ष-एकतीस : अंक-बारा
माघ-फाल्गुन शके १९३५/ चैत्र शके १९३६

## मार्च, २०१४

■ कार्यकारी संपादक ■
डॉ. सुभाष सावरकर
■ संपादन साहाय्य ■
डॉ.नीळकंठ गोपाळ मेंढे ■ डॉ.निरंजनमाधव अंजनकर

प्रकाशक : जनसाहित्य साधना, जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती-५.फो.-०७२१-२५७७४१८
(रजि.नं.महा./१६१६/अन.दि.२६-१०-१९८६)
संगणक महाजाल संकेतस्थळ : www.jansahitya.org
मुद्रक : रवी डाहाके, 'नलिन कॉम्प्युटर्स अँड प्रिन्टर्स' भूमिपुत्र कॉलनी,काँग्रेसनगर, अमरावती.
वर्गणी : वार्षिक - रु.३००/- ■ द्विवार्षिक रु.५५०/- ■ पंचवार्षिक रु.१४००/- ■ दशवार्षिक रु.२७००/-
या अंकाचे देणगी मूल्य - रु.५०/-

■ या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.
■ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

शोधनिबंध

# लोकसाहित्य संशोधनाची आवश्यकता

**प्रा. राजाराम अं. झोडगे**

नूतन महाविद्यालय, सेलू (जि.परभणी) ४३१५०३. भ्रमणभाष-९४२०७८६९७२

लोकसाहित्य हे एकूणच लोकजीवनाला व्यापणारे असते. सामाजिक, सांस्कृतिक लोकमानसाची ती एक सहजस्फूर्त उक्ती आणि उत्स्फूर्त अशी कृती असते. पारंपरिक लोकजीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या या लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे त्यामानाने आपले जरा उशीरानेच लक्ष गेलेले दिसते. विशेषतः इंग्रजांच्या भारतातील आगमनानंतर लोकसाहित्याभ्यासाला गती आल्याचे दिसून येते. त्यापूर्वी येथे अभ्यासाचे काही प्रयत्न झालेच असतील तर ते संकलनाचे वा भाविक/आध्यात्मिक दृष्टिकोनातून केलेल्या अभ्यासाचे! इंग्रज राजवटीत ब्रिटीश अधिकाऱ्यांनी येथले लोकजीवन जाणून घेण्यासाठी तर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी लोकसाहित्याच्या अभ्यासाचे प्रयत्न केलेले दिसतात. त्यांच्यानंतर एतद्देशीयांनी लोकसाहित्याभ्यासाकडे लक्ष वळविले व अलीकडे विविध विद्यापीठांतून हा विषय अभ्यासला जाऊ लागल्याने या क्षेत्रात अभ्यास-संशोधन होऊ लागले आहे.

आज एकीकडे लोकसाहित्याचे संशोधन-अभ्यास मोठ्या प्रमाणावर होत असतानाच दुसरीकडे आधुनिक विज्ञानयुगात जुनाट बाबी व लोकसाहित्याचे काय काम? असे प्रश्न उपस्थित करून नाके मुरडली जात आहेत. लोकसाहित्याबाबत अनेक समज-गैरसमज प्रचलित असून साधारणतः त्यातील काही गैरसमज असे-

(१) लोकसाहित्य हे अडाणी, गावंढळ लोकांचे साहित्य आहे.

(२) आजच्या विज्ञानयुगात लोकसाहित्याची गरज नाही.

(३) पारंपरिक जीवनसंदर्भ बदललेले असल्याने लोकसाहित्य कालबाह्य ठरले आहे.

(४) लोकसाहित्यातील बाबी या जुनाट व अंधश्रद्धा पसरविणाऱ्या आहेत.

यांसारख्या गैरसमजातून लोकसाहित्याला कालबाह्य ठरवले जात आहे. परंतु लोकसाहित्यातील सगळेच टाकाऊ आणि कालबाह्य असत नाही.

लोकसाहित्य हे जसे जुने, पुरातन असते तसेच ते नित्यनूतनही असते. पारंपरिक लोकजीवन जेव्हा काळानुरूप बदलत जाते त्याबरोबरच त्या लोकजीवनाचा आविष्कार असलेले

स्वच्छ व सकारात्मक दृष्टीने पहायला शिकतो. मनाचा संकुचितपणा क्षुद्रता नष्ट होते. व्यापक दृष्टीकोन प्राप्त होतो त्यामुळे जीवनात वाचनाला अनन्य साधारण असे महत्त्व आपण द्यायला हवे.

जग समजून घ्यायचे असेल, कसे जगावे? हे शिकायचे असेल तर त्यासाठी पुस्तके आपणाला मदत करू शकतात. यासाठी आपण वाचन संस्कृतीकडे वळले पाहिजे. परंतु आज प्रत्येकाची तक्रार असेते की, या धावपळीच्या जीवनात वाचनाला वेळच मिळत नाही. काही अशी त्यात तथ्य असले तरी ते पूर्णसत्य नाही आपण एरव्ही बाहेर कितीतरी वेळ विनाकारण खर्च करत असतो. गप्पांमध्ये तासनतास वेळ वाया घालवतो. अन वाचनासाठी मात्र वेळेच कारण पुढे करतो. वाचनाला वेळ लागतो किती? रोज किती वाचावे? याचे काही कुठले शास्त्र नाही. रोज मी रात्री झोपण्यापूर्वी पाच-दहा पाने वाचून मगच झोपेन अशा पद्धतीने जर आपण वाचत राहिलो तर एक चांगली सवय आपल्याला जडेल आणि कालांतराने आपली वाचनाची आवड, गती वाढीस लागेल.

किती वाचावे? यासारखाच काय वाचावे? हा, ही प्रश्न महत्त्वाचा ठरतो. बरेचपण म्हणातत की, आम्ही भरपूर वाचतो. काय वाचतो? तर वर्तमानपत्रे, मनोरंजनक मासिके इ. किंवा विद्यार्थ्यांचे उत्तर असते पाठ्यपुस्तके वाचतो. पाठ्यपुस्तकांचे वाचन हा अभ्यासक्रमासाठीचा आवश्यक भाग असतो. तो तर आवश्क आहेच मात्र याच बरोबर विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त अवांतर वाचन केले पाहिजे. त्यात कथा, कादंबरी, काव्य, नाट्य इ. साहित्य, वैचारिक ग्रंथ, चारित्र, आत्मचरित्र, अनुवादित पुस्तके इ. प्रकारचे साहित्य वाचले पाहिजे. ललित साहित्यांच्या वाचनातून मनाला आल्हाद, आनंद मिळतो. वैचारिक ग्रंथाच्या वाचनातून बुद्धिला धार, तेच चढते. चरित्र-आत्मचरित्र वाचनातून नवी प्रेरणा, आत्मविश्वास मिळतो. यासाठी वाचन आवश्यक ठरते.

मुलांना विद्यार्थीदशेतच वाचनास प्रवृत्त करून त्यांच्या अंगी ही सवय बाणवणे आवश्यक आहे. कारण विद्यार्थी दशेनंतर आपापल्या करीअरमध्ये पुन्हा तेच वेळेचे कारण पुढे केले जाऊ शकते. म्हणून विद्यार्थी दशेतच जेवढे वाचनता येईल तेवढे वाचण्याचा प्रयत्न करावा पालकांनीही आपल्या मुलांना महागडी खेळणी, मोबाईल, मोटारसायकल अशा बाबी देण्यापेक्षा उत्तमोत्तम पुस्तके उपलब्ध करून दिली पाहिजेत. शाळा महाविद्यालयातून मुलांमध्ये वाचनाची गोडी कशी निर्माण होईल, या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. वाचन हा मेंदूला एक महत्त्वाचा व्यायाम आहे. वाचनातून मेंदुला नवीन माहिती समजते आणि नवीन माहिती मेंदूला समृद्ध करत असते.

आजच्या मुलांमध्ये टीव्हीचे फॅड वाढले आहे. मुले तासनुतास टीव्ही समोर बसलेली असतात. टीव्हीचे समोर बसून वेळ वाया घालवण्यापेक्षा काहितरी वाचन करणे हे आपल्या शारीरिकतेच्या दृष्टीनेही किती महत्त्वाचे असते ही बाब मुलांवर बिंबविली जाणे आवश्यक आहे. टी.व्ही. आणि वाचन याबाबत डॉ. यश वेलणकर यांनी म्हटले आहे की, टीव्ही आपल्या मेंदूचा च्युईंगम आहे. चघळतांना बरे वाटते पण कोणतेही पोष्टिक मूल्य त्यातून मिळत नाही तर वाचन हा मेंदूचा पौष्टिक खुराक आहे. टी.व्ही.मुळे आपला अटेन्शन स्पॅन म्हणजे एकाग्रता व कल्पनाशक्ती कमी होते तर वाचनाने या गोष्टी वाढतात. आणि म्हणून सर्वांगीण विकासासाठी वाचन आवश्यक ठरते.

वाचन संस्कृतीच्या वृद्धीसाठी शहरांप्रमाणेच

पेज क्र. १४ वर

लोकसाहित्यही आपला पारंपरिक बाज कायम ठेवून बदलत असते. त्यामुळे लोकजीवनाचा सखोल अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्य संशोधनाची आवश्यकता असते. जुन्यातून नवे शोधण्याचा प्रयत्न लोकसाहित्य अभ्यासातून व्हावा. अर्थात् जुने ते सगळेच सोने मानून रूढी-परंपरांना कवटाळून बसणे म्हणजेच लोकसाहित्य नाही याचेही भान असणे आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक व विज्ञानयुगाचा दाखला देत लोकसाहित्याला कालबाह्य ठरवून अंतराळ संशोधनाच्या आणि तांत्रिक प्रगतीच्या युगात लोकसाहित्य, लोकसंस्कृती यांचा अभ्यास कितपत योग्य आहे? असा प्रश्न विचारणाऱ्यांना तारा भावळकरांनी दिलेले उत्तर मार्मिक आहे. त्या म्हणतात-'आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, अमेरिका, जर्मनी आणि रशिया यांसारख्या ज्या देशांनी तांत्रिक क्षेत्रात प्रगतीची आघाडी मारलेली आहे. त्या देशांतूनच आज लोकसाहित्यविषयक अभ्यासाबद्दल आस्था बाळगली जात आहे. विद्यापीठांतून हा विषय शिकवला जात आहे. खास अभ्यास विभाग सुरू झाले आहेत.'[१]

लोकसाहित्य हे लोकजीवनाचे एक अविभाज्य अंग असते. त्यातून समाजमानसाचा उत्कट अविष्कार झालेला असतो. त्यामुळे एखाद्या क्षेत्रातील लोकजीवन, त्यांचा भूतकाळ, संस्कृती, चालीरीती, लोकमानस इ. समाजजीवनाच्या बाबी समजून घेण्यासाठी लोकसाहित्याभ्यासाची, संशोधनाची गरज असते.

लोकसाहित्य जसे समाजमानस प्रतिबिंबित करीत असते, तसेच ते लोकसंस्कृतीचाही आरसा असते. लोकजीवनातील विचार, कल्पना, भावना, श्रद्धा, परंपरा, विश्वास, सण-उत्सव इ. बाबी या लोकसाहित्याचा अविभाज्य भाग असतात. त्यामुळे एखाद्या समाजाची संस्कृती, परंपरा जाणून घेण्यासाठीही लोकसाहित्याभ्यास महत्त्वाचा ठरतो. दुर्गा भागवतांनी लोकसाहित्याभ्यासाला संस्कृती-अभिसरणाचा अभ्यास असे म्हटले आहे. थोडक्यात, संस्कृति-सातत्य आणि तिच्यात होणारे परिवर्तन इ. च्या अभ्यासासाठी लोकसाहित्य संशोधनाची आवश्यकता असते.

लोकसाहित्य हे अनौपचारिक शिक्षणाचे एक माध्यम आहे. लोकगीते, लोककथा, प्राणीकथा, म्हणी इ.तून काही विचार, मूल्ये सांगितलेली असतात. पिढ्यान्‌पिढ्या मानवाने घेतलेले अनुभवज्ञानाचे सार लोकसाहित्यात असते. त्यामुळे अशा ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा आपल्याला व भविष्यकालीन पिढीला मिळवून देण्यासाठी लोकसाहित्याभ्यास महत्त्वाचा ठरतो. तसेच लोकमानसातील समजुती, विश्वास, परंपरा यांतील सर्वच बाबी या सत्य व उपयुक्त वा उपकारक असतीलच असे नाही. त्यामुळे त्यांतील योग्य-अयोग्य काय? टाकाऊ आणि टिकाऊ काय? याची चिकित्सा होणे गरजेचे आहे. यासाठी लोकसाहित्याच्या चिकित्सक अभ्यास व

संशोधनाची गरज आहे.

लोकसाहित्य हे अनौपचारिक शिक्षणाचे तसेच नीतिशिक्षणाचेही माध्यम असते. माणसाने कसे वागावे? कसे वागू नये? सत्य-असत्य, न्याय-नीती इ. बाबी लोकमानसात प्रचलित असलेल्या अनेक कथा-गीतांतून सांगितलेल्या असतात. त्या माध्यमातून समाजातील गैरवर्तनाला प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केलेला असतो. आजच्या आधुनिक , चंगळवादी युगात मूल्यहीनतेकडे वळणाऱ्या समाजात नीतिमूल्यांची जोपासना करण्यासाठी व ही मूल्ये अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवण्यातही लोकसाहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळेही लोकसाहित्याभ्यास महत्त्वाचा ठरतो.

लोकसाहित्य हे लोकांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित असते; नव्हे त्यांच्या जीवनाचा ते एक अविभाज्य भाग असते. त्यामुळे मानवी जीवन, त्याचा इतिहास, परंपरा इ. च्या अभ्यासासाठी ते एक महत्त्वाचे साधन ठरते. मानवी जीवनाचा समग्र वेध घेताना केवळ भूतकाळातील मृत अवशेषांचे पुरावे एका मर्यादेपर्यंतच उपयोगी पडतात. ऐतिहासिक कागदपत्रे, शिलालेख, नाणी यांतून फार तर तत्कालीन राज्यकर्त्या वर्गाची माहिती मिळू शकते. पण लोककथा, लोकगीत, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे (शिव्या सुद्धा) हे शाब्द साहित्य सामान्यातील सामान्य माणसाच्या मनातील भावनांची, विचारांची, धारणांची सूक्ष्मातिसूक्ष्म आंदोलने जतन करत असते. बदलत्या भौतिक जीवनातील पडसादही या शाब्द लोकसाहित्यात अगदी सहजपणे उमटलेले असतात. त्यामुळे लोकसाहित्य हे लोकजीवनाचा, लोकमानसाचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचे एक महत्त्वाचे साधन ठरते.[१]

लोकसाहित्य हे विविध कलाप्रकारांची गंगोत्री असते. आज प्रचलित असलेल्या अनेक कला, वाङ्मय यांचे ते प्रेरणास्रोत असते. त्यामुळे आधुनिक कला-वाङ्मयाच्या दृष्टीनेही लोकसाहित्याभ्यास महत्त्वाचा ठरतो. ललित वाङ्मय आणि लोकसाहित्य यांच्यातील संबंधही सर्वज्ञात आहे. ललित साहित्यात लोकसाहित्यातील अनेक कल्पनाबंध, रचनातंत्र आशय-विषय इ. बाबी आलेल्या असतात. ललित साहित्यात आलेले हे कल्पनाबंध, शब्द, त्यांमागे असलेले लोकमानस, लोककल्पना समजल्याशिवाय आपणास खऱ्या अर्थाने ललित साहित्याचा आस्वाद घेता येणार नाही. त्यामुळे या पारंपरिक बाबी समजून घेण्यासाठी मदत घ्यावी लागते ती लोकसाहित्याची. म्हणूनच ललित वाङ्मयाच्या संदर्भातही लोकसाहित्याभ्यास आवश्यक ठरतो.

भाषा ही समाजातील एक महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही लोकसाहित्य संशोधनाची आवश्यकता असते. लोकसाहित्य हे बोलीभाषेत प्रचलित असते. त्या-त्या समाजाच्या बोलीचे विशेष तेथे प्रचलित असलेल्या लोकसाहित्यात सामावलेले

असतात. लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, शिवी इ. मध्ये शब्दवैभव, उच्चारवैभव व अर्थवैभव असते. तसेच एखाद्या भाषेच्या परंपरेचा, इतिहासाचा मागोवा घेण्यसाठी इतर साधने जेव्हा अपुरी पडतात तेव्हा परंपरेने चालत आलेले लोकवाङ्मय हे भाषाभ्यासाची एक महत्त्वाची सामग्री ठरते. या दृष्टीने अनेक भाषा अभ्यासक लोकसाहित्याचे संशोधन करीत आहेत.

आज विज्ञानाने सर्वच क्षेत्रांत प्रचंड प्रगती केली आहे. वैद्यकीय क्षेत्राचेच उदाहरण घ्यायचे झाले तर अॅलोपॅथी, होमिओपॅथी, अॅक्यूपंचर अशा उपचार पद्धतींसह नवनवीन तंत्रज्ञान आले आहे. असे असले तरीही आयुर्वेदाकडचा कल व ओढ आजही संपलेली नाही. आयुर्वेद हा पारंपरिक लोकवैद्यकाचा म्हणजे लोकसाहित्याचा एक भाग. पूर्वी आजीबाईचा बटवा प्रसिद्ध असायचा. छोट्या-मोठ्या आजारांवर घरगुती इलाज केले जायचे. आज आपण वैद्यकीय क्षेत्रात खूप प्रगती केली असली तरीही एड्स, कर्करोग, हृदयविकार यांसारखे असाध्य रोग हे आव्हान ठरत आहेत. पारंपरिक लोकवैद्यक हे आधुनिक वैद्यकशास्त्रास उपयुक्त ठरले आहे. यावेळी लोकवैद्यकाच्या क्षेत्रात संशोधन होणे गरजेचे आहे. अनेक औषधी वनस्पती व तिच्या उपयोगाची माहिती असणारी जुनी माणसे आता कालवश होऊ लागली आहेत. त्यांच्याकडून ही माहिती मिळवून त्यात संशोधनास मोठा वाव आहे.

एकूण लोकसाहित्य हे समग्र लोकजीवनाला व्यापणारे असल्याने समाजशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र, विविध कला, संस्कृती इ.च्या अभ्यासासाठी ते उपयुक्त ठरते. त्यामुळे विविध शास्त्रांत नवनवीन संशोधनाची भर टाकण्यासाठी आणि मानवी जीवनाच्या सखोल अध्ययनासाठी लोकसाहित्याचा अभ्यास-संशोधन महत्त्वाचे ठरते. मात्र लोकसाहित्य संशोधनात 'जुने ते सोने' मानून पारंपरिक बाबींचे केवळ संकलन किंवा आस्वादात्मक लेखन म्हणजेच संशोधन असे मानू नये. दुर्दैवाने अलीकडे हेच चित्र दिसत आहे. एम्.फिल., पीएच्.डी. सारख्या पदव्या मिळवण्यासाठी एक सोपा विषय म्हणून लोकसाहित्याकडे न बघता मानवी जीवन समजून घेण्याचे व भूतकाळाकडून काही धडे घेऊन भविष्यकालीन पिढीला दिशानिर्देश करण्याचे काम लोकसाहित्य संशोधनातून व्हावे. त्यामुळे आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातही लोकसाहित्याचे अध्ययन-संशोधन होणे आवश्यकच आहे, यात प्रत्यवाय नाही. मात्र त्यात शास्त्रीय दृष्टिकोन असावा, चिकित्सक वृत्ती असावी, एवढेच.

**संदर्भ ग्रंथसूची-**

(१) भवाळकर डॉ.तारा, लोकसंचित, राजहंस प्रकाशन, पुणे, १९८९, पृ.१०. (२) तत्रैव, पृ.६. (३) देवरे डॉ.रमेश, लोकसाहित्य दर्शन, कर्मवीर प्रकाशन, पुणे, २००९. (४) भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रूपरेखा, वरदा बुक्स, पुणे, १९७७. (५) शिंदे डॉ.विश्वनाथ, लोकसाहित्यमीमांसा-भाग पहिला, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९८.

■ ■ ■